१०

# जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते कि, मौजे रावेत येथील स नं १८६ पासुन पुर्वेकडे स नं १९१ पर्यंत १८ मी रूंदीचा रस्ता नागरिकांना दळणवळणासाठी उपलब्ध नाही. त्यामुळे महानगरपालिकेसही तैथील रहिवाश्यांना मुलभूत / सुविधा जसे रस्ता, विद्युत खांब, पाणीपुरवठा व जलनिस्सारण वाहिनी इत्यादी सुविधा पुरविता येत नाही. सदर रहिवासीयांच्या अडीअडचणीचा यथोचित विचार करून तेथील लोकप्रतिनिधीनी सदर ठिकाणी सोबतचे नकाशात दर्शविलेनुसार मौजे रावेत येथील स नं १८६ लगतच्या दक्षिणोत्तर शिंदे वस्ती १२ मी रस्त्याचे डावीकडे १८ मी रस्ता यापुर्वीच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम सन १९४९ चे कलम २०५ अन्वये घोषित करणेत आला आहे. तरी त्याच्या पुर्वेस मौजे रावेत स नं १८६ पासुन पुर्वेकडे स नं १९१ पर्यंत १८ मी रूंदीचा रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये घोषित करणेकामी मा. ब प्रभाग समिती सभा ठराव क्र. ३१, दि. १६/११/२०१८ अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे. व मा. आयुक्त यांना प्राप्त अधिकारानुसार मौजे रावेत येथील स नं १८६ पासुन पुर्वेकडे स नं १९१ पर्यंत १८ मी रूंदीचा रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अंतर्गत १८.०० मी रूंदीचा मनपा रस्ता घोषित करणेकामी मान्यता दिली आहे. त्यानुषंगाने नकाशात दर्शविल्याप्रमाणे १८.० मी मनपा रस्ता घोषित करण्याचा इरादा जाहिर केलेला आहे.

सदर घोषित करावयाच्या रस्त्याचा आराखडा नागरिकांच्या अवलोकनार्थ कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत महानगरपालिकेच्या नगररचना व विकास विभागात उपलब्ध करण्यात आलेला आहे. याबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत/ सूचना असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत आवश्यक कागदपत्रांसह लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत प्राप्त झालेल्या हरकती/ सूचनांवर योग्य तो विचार करून इराद्याप्रमाणे म्युनिसिपल रस्ता घोषित करण्यात येईल. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या कोणत्याही हरकत/ सूचना विचारात घेतली जाणार नाही.

स्थळ – पिंपरी, पुणे

दिनांक - ३१/१२/२०१९

जाहिरात क्रमांक 302

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८